# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक ०७/०७/२०१७**

**दु ११.३० वा.**

| अनु. क्र. | विषयाचे नाव | मा.स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि. २३ /०६ /२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. २३/०६/२०१७ रोजीचे इतिवृत्त दरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री. सुनील आचोळकर सूचक :- मा.श्री.अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(४) अन्वये, मा. स्थायी समिती वरील निवृत्त होत असलेल्या सदस्या बाबत. | ठराव : विद्यमान स्थायी समिती मधील १) नितिन दिनानाथ राऊत २) पंकज भास्कर ठाकूर ३) छाया धर्मदत्त पाटील ४) प्रशांत दत्तात्रेय राऊत ५) चंद्रकांत यशवंत गोरिवले ६) सुनिल मोरेश्वर आचोळकर ७) समीर जीकर डबरे व ८) किशोर गजानन पाटील हे दिनांक १/०८/२०१७ रोजी दुपारी निवृत्त होत आहेत. सदर रिक्त होण्याऱ्या या जागी नविन ०८ सदस्यांची नियुक्ती करण्यांचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेत सादर करण्यात यावा अशी सभा सर्वानुमते ठरवित आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री.अजीत नाईक सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका वाढीव १०० द.ल.ली सुर्या पाणी पुरवठा (टप्पा -३ ) योजनेच्या मासवण व धुकटण येथील अशुध्द व शुध्द पाणी उपसा पंपीग स्टेशनसाठी विज पुरवठा होण्याच्या दृष्टीने अनुषंगीक कामे करणे कामी सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवून असे ठरविण्यांत आले की, सदर कामी सादर केलेल्या रक्कम रू. ४३,०९,८१८/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असून सदर कामी मूळ मंजूर ठेकेदार यांचेकडून मंजूर दरानुसार काम करुन घेण्यास व त्यानुसार येणाऱ्या खर्चास ही सभा अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.समीर डबरे सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ४ | केंद्र शासन पुरस्कृत "अमृत अभियान अंतर्गत" प्रभाग समिती "अ" विरार (प.) दिवेकर हॉस्पीटल येथील प्रस्तावित जलकुंभाच्या ठिकाणी येणारा रोहित्र स्थलातंरीत करण्यास येणाऱ्या खर्चास कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत. | **ठराव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची - ड, प्रकरण-५ संविदा २ (२) नुसार केलेल्या निहीत कार्यवाहीस ही सडा मंजूरी देत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे पर्यावेक्षण शुल्क अशा एकूण खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री.वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५ | प्रभाग समिती 'जी' विभागातील राजावली वाघराळपाडा येथे विविध व्यासाच्या डि.आय. जलवाहीनी अंथरणे कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत चर्चा होवून उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. त्याचप्रमाणे सदर कामी जाहीर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व जाहीरात प्रसिध्दीचा खर्च अदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री.सुनील आचोळकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६ | महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर इंडसइंड बँक (Induslnd Bank) चे पेमेंट गेटवे (Payment Gateway) कार्यान्वित करणे बाबत. | **ठराव :-** सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. याकामी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर इंडसइंड बँक(IndusInd Bank) चे पेमेंट गेटवे (Payment Gateway) कार्यान्वित करण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.समीर डबरे सूचक :- मा.श्री.किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७ | प्रभाग समिती 'सी' मधील विरार (पू.) प्रभाग 'सी' मध्ये सर्व्हे नं.१६ येथील बहुउद्देशीय इमारती मधील फर्निचरचे काम करणे या कामी प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७१,३१,५९७/- या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा प्रक्रियेद्धारे निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री.वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ८ | **टर्न टेबल लॅंडर (T.T.L) अग्निशमन वाहनाचे अतिरिक्त टायर खरेदीचे देयक अदा करणेस मंजुरी बाबत.** | **ठराव :-** महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडे विदेशी कंपनीचे टर्न टेबल लॅंडर (T.T.L) वाहन वापरात असून सदर वाहन आपत्कालीन परिस्थितीत वापरात आहे. वाहनाचा टायर अचानक फुटल्यास तो त्वरीत बदलता यावा याकरीता अतिरीक्त एक नग पुढील व एक नग मागील असे दोन नग टायर खरेदी कामी केलेल्या कार्यवाहीस व झालेल्या खर्चास तसेच झालेल्या बिलाची रक्कम रू. ३,०८,५३७/- ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांनी अदा करणेस ही सभा मंजूरी देत आहे. **अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९ | **श्री.कृष्णा रामचंद्र खाटकेकर, शिपाई,नायगाव विभागीय कार्यालय यांची वैद्यकीय खर्चाची देयके अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित झालेल्या निर्णयास अधिन राहून व तसेच महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्रमांक वैखप्र-२००१/प्र.क्र.३३३/११ सकावि-२ दिनांक १६ नोव्हेंबर २०११ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती आय, नायगांव विभागीय कार्यालयातील कर्मचारी श्री. कृष्णा रामचंद्र खाटकेकर यांना दिनांक १४/०९/२०१५ ते दि. ३०/११/२०१५ या कालावधीत टाटा मेमोरीयल हॉस्पीटल, मुंबई येथे कॅन्सर विकाराचे शस्त्रक्रिया व औषधोपचारासाठी झालेला एकूण खर्चापैकी त्यांना अनुज्ञेय असणारी एकूण निव्वळ रक्कम रू. ४,१२,५६१/- वैद्यकिय प्रतिपूर्ती करणेंस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे सूचक :- मा.श्री.किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १० | **प्रभाग समिती - डी, क्षेत्रातील नालासोपारा पुर्व गालानगर येथे वाहतुक बेट सुशोभिकरण करणे (मा.आ.श्री. क्षितीजजी ठाकूर यांच्या फंडाअंतर्गत सन २०१५-१६) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे.गजानन कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (+) ४.९७% जास्त दराने ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री.राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ११ | विरार (पू.) प्रभाग समिती 'सी' मध्ये सर्व्हे नं.१६ येथील बहुउद्देशील इमारतीमधील पहिल्या मजल्याच्या फर्निचरचे काम करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत. | **ठराव :-** सदर कामास मा.स्थायी समिती सभा विषय क्र.२, दि. २९.०९.२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्ट्या मे. संजय कन्स्ट्रक्शन ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ४.८६% जास्त दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिकेचे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिकेचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १२ | दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत समिती 'ई ' (आय) कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ मधील जामा मस्जिद ते मनशांती अपा. बौध्दवाडा पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.(सन २०१३-१४) | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे.नेवाळकर एंटरप्रायजेस ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ३.००% कमी दराची सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजुरी दिली आहे. याकामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभ मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अजीत नाईक सूचक :- मा.श्री.सुनील आचोळकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १३ | **प्रभाग समिती "एच" च्या हद्दीतील "एच.डी.एफ.सी. बँकेपासून उषा स्वप्न बंगल्यापर्यंत एका रांगेत (अंबाडी क्रॉस लेन नं. १ ते क्रॉस लेन नं. ३ मधील जागा) या ठिकाणी पे ॲण्ड पार्कची भाडे वसूली करणेबाबतच्या" जाहीर ई निविदा प्रक्रियेतील जादा दराची निविदा मंजूर करुन कार्यादेश देणेकरीता मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** उपरोक्त प्रस्तावाचा मजकूर पाहता प्रभाग समिती "एच" च्या हद्दीतील "एच.डी.एफ.सी. बँकेपासून उषा स्वप्न बंगल्यापर्यंत एका रांगेत (अंबाडी क्रॉस लेन नं. १ ते क्रॉस लेन नं. ३ मधील जागा) सदर कामास मा.स्थायी समिती सभा दिनांक ०३/०४/२०१७ सभा सुचना क्र. १, सभा ठराव क्र. ०६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या मे शान एंटरप्रायजेस यांची निविदा अपेक्षित रक्कमेपेक्षा ७,४०,०००/- (अक्षरी सात लाख चाळीस हजार मात्र) ही इतर तीन निविदाकारांच्या दरापेक्षा जादा दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या जादा दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता तसेच सदर निविदा प्रक्रियेसाठी निविदेत नमुद कालावधी ओलांडला असल्याने सदर निविदाकारास माहे ऑगस्ट २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीसाठी प्राप्त रक्केवर आठ (८) महिन्यांसाठी रक्कम रु. ५,९२,०००/- इतकी रक्कम स्विकारणेस व उपरोक्त नमुद ठिकाणी पे ॲण्ड पार्कची भाडे वसूली करणेबाबत तसेच संविदा करु कार्यादेश देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती महाराष्ट्र महानगरपालिका अधनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री.राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १४ | **वसई विरार शहर महानगरपालिका शालेय जिल्हा क्रीडा स्पर्धा २०१७ आयोजनाबाबत.** | **ठराव :-** वरील बाबींवर अंदाजित रक्कम रु. २६ लक्ष (अक्षरी सव्वीस लक्ष) इतका खर्च अपेक्षित असून सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात २ कोटी १२ लक्ष (अक्षरी दोन कोटी बारा लक्ष मात्र) इतकी तरतुद करण्यांत आलेली आहे. तरी महानगरपालिका हद्दीतील विद्यार्थ्यांसाठी जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धाचे आयोजन करणेंस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास आजची सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १५ | **सन २०१६-१७ सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या वित्तीय वार्षिक वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I** | **ठराव** :- सदर कामास मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५, दि. २०/०२/२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहिर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्टया मे. संजय कन्स्ट्रक्शन, मे. फन प्ले सिस्टिम, मे. श्री. एंटरप्रायजेस, मे. प्रॅनिक एंटरप्रायजेस, मे. अरिहंत इंडस्ट्रिअल कॉर्पो. लि., मे. द. हिंद इलेक्ट्रिकल ॲन्ड इंजि., मे. सनसन इंडस्ट्रीज प्रा.लि. यांचे निविदा दर (वाटाघाटीने) लघुत्तम आहेत. तसेच सदर दराने निविदेमधील सहभाग घेतलेल्या अन्य निविदाधारक काम करणेस इच्छुक असल्यास त्यांनाही पॅनेलवर नियुक्त करुन त्यांच्याकडून काही काम करुन घेणेकरीता दि. |

| | | |
|---|---|---|
| | **मधील विधि उद्यानात विविध प्रकारची खेळणी व फिटनेस साहित्य बसविणे व सहभाग घेण्यात आलेल्या ठेकेदारांची पॅनेलवर नियुक्ती करणे.(बी-२ निविदा)** | ०३/०५/२०१७. रोजी पत्र देण्यांत आले होते. तरी सदर पत्रास अनुसरुन मे. संजय कन्स्ट्रक्शन, मे. फन प्ले सिस्टिम, मे. श्री. एंटरप्रायजेस, मे. प्रॅनिक एंटरप्रायजेस हयांनी सर्व ॲटम व स्पेअर पार्टस् निम्नत्तम दराने पुरविणेची व बसविणेची तयारी दर्शविली आहे. त्यांची पॅनलवर नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच सन २०१६-१७ हे वर्ष संपुष्टात आल्यामुळे सदरचे दर नामंजुर करण्यांत येत आहेत व पुढील दोन वर्षांसाठी सन २०१७-१८ व सन २०१८-१९ करीताचे दर आपल्याला मंजुर करण्यांत येत आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त हयांनी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा. स्थायी समिती सभा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुनील आचोळकर सूचक :- मा.श्री.वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

**नगरसचिव**

**वसई विरार शहर महानगरपालिका**